पुढारी

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर

| | |
|---|---|
| जावक क्रमांक/३४४८/२०२५<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत<br>आकाशवाणी समोर, सावेडी,<br>अहिल्यानगर-४१४००३. | Public Trusts Registration Office,<br>Second Floor, Central Administrative,<br>Building, Near Akashwani,<br>Ahilyanagar - 414003<br><br>दिनांक - ९/१०/२०२५ |

# जाहीर नोटीस

## किरकोळ अर्ज क्र. १०६/२०२५ आणि ८७/२०२५

या जाहीर नोटीसीने तमाम नागरिकांना कळविण्यात येते कि, सार्वजनिक न्यासाचे नाव श्री कान्होबा ऊर्फ कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मु. पो. मढी, ता. पाथर्डी, जि.अहिल्यानगर, न्यास नोंदणी क्र. ई -८९/ अहिल्यानगर या देवस्थानच्या विश्वस्त मंडळाची ११ विश्वस्तांची नेमणूक न्यासाच्या मंजूर योजनेमधील तरतुदीप्रमाणे पुढील पाच वर्षासाठी मा. धर्मदाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे करणार आहेत, न्यासाच्या मंजूर योजनेतील कलम ६,८,९ व १० मधील तरतूदी नुसार विश्वस्त नेमणूकीसाठी पात्र असणारी व्यक्ती हि कायद्याने करार करावयास पात्र असणाऱ्या सज्ञान व धार्मिक कार्याची आवड असणाऱ्या सत प्रवृत्ती कार्यप्रवण निस्वार्थी तळमळीने व सर्मपित वृत्तीने आणि निष्ठेने काम करणाऱ्या कोणतीहि व्यक्तीस /इसमास विश्वस्त पदासाठी अर्ज करता येईल.

११ (अकरा) विश्वस्तापैकी ६ (सहा) विश्वस्त मौजे मढी, ता. पाथडी, जि. अहिल्यानगर येथील मरकड कुटूंबातील ४ (चार) बेटातील असतील व इतर पाच विश्वस्त हे कानिफनाथ देवस्थानच्या भाविकांमधून नेमावयाचे आहेत. तरी इच्छुक असलेल्या व्यक्तीनी दिनांक ११/११/२०२५ सायकांळी ५ वाजेपर्यंत पोहचतील असे लेखी अर्ज या कार्यालयाकडे सोबत जोडलेल्या विहित नमुण्यातील अर्ज माहिती व संमतीसह बरील पत्यावर वेळेत दाखल करावेत दिनांक ११/११/२०२५ रोजी सायकांळी ५ वाजलेनंतर या कार्यालयात दाखल होणाऱ्या किंवा प्रत्यक्ष किंवा टपालाद्वारे प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व स्वीकारले जाणार नाहीत, याची संबंधीतानी योग्य नोंद घ्यावी.

**अर्जासोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहेत.**

१) विहित नमुन्यातील अर्ज, पत्ता, रहिवाशी आणि वयाचा पुरावा व उत्पन्नाचा तहसिलदार यांचा दाखला.

२) अर्जदाराने अर्जातील संपूर्ण माहिती खरी असल्याबाबतचा रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर सक्षम प्राधिकारी यांचे समोरील विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जमा करावे.

३) अर्जदारास स्वतःचे चारित्र्याबाबत व कोणताही गुन्हा दाखल नसले बाबत संबंधित पोलीस स्टेशनचे प्रमाणपत्र.

४) मरकड कुटूंबीयांपैकी असलेल्या अर्जदारांनी ते कोणत्या बेटातील आहे याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

विहित मुदतीत, विहित नमुन्यातील व त्यासोबतचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात नसतील तर असे अर्ज बाद समजण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. अर्जदाराने अर्जात नमूद केलेली सर्व मूळ कागदपत्रे मुलाखतीचे दिवशी हजर करणे बंधनकारक राहील, अन्यथा सदर अर्जदार अपात्र समजण्यात येईल.

विहित नमुन्यातील अर्ज व प्रतिज्ञापात्राचा नमुना हा या कार्यालयाच्या, देवस्थानच्या मु. मढी, ता. पाथडी, जि. अहिल्यानगर येथील नोटीस बोर्डवर व ग्रामपंचायत कार्यालय मढी, ता. पाथडी, जि. अहिल्यानगर येथील नोटीस बोर्डवर लावलेला आहे.

ही जाहीर नोटीस मा. धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर यांचे सही शिक्क्यानिशी आज दि. ०९/१०/२०२५ रोजी दिली. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारिख ही ११/११/२०२५ राहील.

कोर्टाचा शिक्का

सही/-
**नवनाथ जगताप**
धर्मादाय उप आयुक्त,
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर.

## विश्वस्त पदासाठी अर्ज

**(किरकोळ अर्ज क्र. १०६/२०२५ आणि ८७/२०२५ मध्ये)**

सार्वजनिक न्यासाचे नाव : श्री.कान्होबा ऊर्फ कानिफनाथ देवस्थान, मढी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर. न्यास नोंदणी क्र. ई-८९/अहिल्यानगर

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : ------------------
संपर्क क्रमांक ई-मेल आय.डी : ------------------
२) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता : ------------------
३) योजनेतील तरतुदीप्रमाणे पात्रता आहे काय ? : ------------------
४) जन्म तारीख व अर्जदाराचे अर्जाचे दिनांकास वय : ------------------
५) व्यवसाय : ------------------
६) वार्षिक उत्पन्न : ------------------
७) शैक्षणिक पात्रता : ------------------
८) स्थावर मालमता आहे काय ? असल्यास कागदपत्रासह तपशील : ------------------
९) न्यासाचे मिळकतीत प्रतिकूल संबंध आहेत काय ? : ------------------
किंवा न्यासाचे मिळकतीवर अर्जदार भाडेकरू / कुळ आहे काय ?
१०) अर्जदार हे माजी विश्वस्त आहेत काय ? (असल्यास कालावधी ) : ------------------
११) अर्जदाराने चारित्राबाबत संबंधित पोलीस स्टेशनचे : ------------------
प्रमाणपत्र/दाखला जोडला आहे काय ?
१२) अर्जदाराने अर्जातील संपूर्ण माहिती खरी असल्याबाबत
१००/- रु. च्या स्टॅम्प वरील प्रतिज्ञापत्र जोडले आहे का ? : ------------------
१३) विश्वस्त म्हणून नेमणूक होण्यासाठी इतर विशेष पात्रता : ------------------
१४) रहिवासी असले बाबतचा तहसीलदार / ग्रामसेवक यांचा रहिवासी दाखला : ------------------
१५) शेरा व इतर माहिती : ------------------
१६) बेटाचे असल्यास त्याबाबतची माहिती : ------------------

मी---------------------------------------- -------वय----- वर्ष,---- व्यवसाय---- रा.---------ता. -------- जि.----------- येथील रहिवासी असून सत्य प्रतीज्ञेवर लिहून देतो/देते की, वरीलप्रमाणे माझेबाबतची माहिती खरी व बरोबर आहे. तसेच मी वर उल्लेख केलेल्या धार्मिक न्यासाचा विश्वस्त म्हणून जबाबदारीने व प्रामाणिकपणे काम करण्यास तयार आहे.

ठिकाण :-अहिल्यानगर. सही-----------------
दिनांक :- नाव-----------------

**सक्षम प्राधिकारी यांचे समोर करावयाच्या रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्राचा नमुना प्रतिज्ञापत्र**

मा. ------------------------------------------------------------यांचे समोर,

मी खाली सही करणार श्री/श्रीम./सौ.------------------------------------------------वय वर्षे-----व्यवसाय : -------- रा.----------ता.------------------------- येथील रहिवासी असून सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की 'श्री कान्होबा ऊर्फ कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर न्यास नोंदणी क्र ई-८९/अहिल्यानगर या न्यासावर विश्वस्त म्हणून नियुक्ती होण्यासाठी अर्ज दाखल करत आहे. अर्जातील मजकूर खरा व बरोबर असून अर्जासोबत मी खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. २.
३. ४.
५

मी--------------------------------वय-----वर्षे,--- व्यवसाय :---------- रा. मु. पो.------ ---------ता. -----------येथील रहिवासी असून 'श्री कान्होबा ऊर्फ कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर न्यास नोंदणी क्र ई-८९/अहिल्यानगर या देवस्थानला मानणारा भाविक/भक्त आहे. मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो/करते की, माझेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा पोलीस स्टेशनला दाखल नाही व कोणत्याही गुन्हात मला शिक्षा झालेली नाही. संबंधित पोलीस स्टेशनचा चारित्र्य पडताळणी दाखला मी अर्जासोबत जोडला आहे.

मी------------ ता.---------जि.अहिल्यानगर येथे गेल्या -------इतके वर्षांपासून राहत असून, तेथील रहिवासी व प्रौढ आहे. तसेच न्यासाच्या योजनेप्रमाणे विश्वस्त होण्यास मी पात्र आहे.

अर्जातील माहिती व त्या सोबत जोडलेली कागदपत्रे खरी व बरोबर असून ती खोटी व चुकीची आढळून आल्यास भा.दं.वि. कलम १९९/२०० नुसार शिक्षेस पात्र राहील तसेच विश्वस्त पदावरून काढून टाकण्यास पात्र राहील.

ठिकाण:- सही
दिनांक:- नाव